अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

▶ वर्ष : २४ वे ▶ अंक : ११८ वा ▶ किंमत : ५ रुपये ▶ पाने १२

www.surajyadigital.com । रविवार, दि. २५ जानेवारी २०२६ ।


# धैर्यशीलभैय्यांचा सुफडासाफ Pattern!



✔ सोलापूर/प्रतिनिधी

सोलापूर जिल्ह्यातील जनता स्वाभिमानी आहे. पुरोगामी विचाराची आहे. या जिल्ह्यात पुरोगामी' विचारच चालतो. लोकसभा, विधानसभा आणि नगरपालिका या तिन्ही निवडणुकांमध्ये जिल्ह्यात भाजपचा 'सुफडासाफ' पॅटर्न राबला. तोच पॅटर्न होऊ घातलेल्या जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या निवडणुकांमध्ये राबेल, असा आत्मविश्वास राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे नेते आणि माढ्याचे खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांनी व्यक्त करतानाच, 'सोलापूरचे पाणी दाखवू' असा इशारादेखील त्यांनी पालकमंत्री जयकुमार गोरेंना दिला. जिल्हा नियोजन समितीमधील मनमानी पद्धतीच्या निधी वाटपासंदर्भात आपण न्यायालयात जाणार असल्याचे ते म्हणाले.

माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील यांच्या उपस्थितीत शुक्रवारी (ता.२४) मेंढापूर (ता.पंढरपूर) येथे दुधेश्वर मंदिरात नारळ फोडून प्रचाराचा शुभारंभ करण्यात आला. त्या सभेत आणि त्यानंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांनी राज्य सरकारच्या कारभारावर जोरदार टिका केली.

खासदार मोहिते-पाटील पुढे म्हणाले की, डीपीसीचा निधी सर्वांना मिळायला हवा. विकास कामांसाठी या निधींचे वाटप कायदेशीर मार्गाने तसेच निकषांनुसार व्हायला हवे, निधीसंदर्भात निश्चित धोरण ठरायले हवे, मात्र या निधी वाटपासंदर्भात मनमानी सुरु असून या प्रकरणी आपण न्यायालयात जाणार आहोत असे ते म्हणाले. जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर, आम्ही आमच्या विचारांच्या लोकांना घेऊन फिरत आहोत,

## डीपीडीसी निधीबाबत न्यायालयात जाणार

## पालकमंत्र्यांना सोलापूरचे 'पाणी' दाखवणार

## केंद्राचे पथक २८ जानेवारीपासून सोलापूर जिल्ह्यात, 'भीमे'च्या प्रदूषण मुक्तीसाठी जाणार सविस्तर अहवाल

भीमा नदीचे प्रदूषण रोखण्यासाठी केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे आपण पाठपुरावा केला आहे. त्यानुसार, येत्या २८ ते ३० जानेवारीपासून दिल्ली येथील प्रदूषण नियंत्रण मंडाळचे अधिकारी पुणे ते पंढरपूरदरम्यान सर्वे करुन अहवाल तयार करणार आहेत. तो अहवाल केंद्र आणि राज्य सरकारला देणार आहेत. नदी प्रदूषणाचा प्रश्नही लवकरच मार्गी लागेल. या पथकात प्रदूषण नियंत्रण मंडळाचं राज्याचे पथकेदेखील सहभागी असेल.

## भाजपमध्ये थेट 'लॉचिंग'; घराणेशाहीवर धैयशीलभैय्यांचे भाष्य

जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या निवडणुकीच्या उमदेवारीमध्ये घराणेशाही दिसत आहे, या प्रश्नावर खासदार मोहिते-पाटील यांनी भाष्य केलं. आम्ही लोकांमध्ये जात होतो, कामे करत होतो. लोकांकडून निवडणुकीत उभे राहण्याची मागणी व्हायची. मात्र भाजपकडून थेटच लॉचिंग होत आहे, असे ते म्हणाले.

## तीन महिन्यात रुपयाचा निधी नाही; लाभधारकांनी काढले व्याजाने पैसे

सरकारकडून उपलब्ध होत नसलेल्या निधीच्या जिव्हाळ्याच्या मुद्यावर बोट ठेवताना मोहिते-पाटील म्हणाले की, घरकुल योजनेसाठी मागील तीन महिन्यात एक रुपयाचादेखील निधी आलेला नाही. लेंटल लेव्हलपर्यंत घरकुलांची बांधकामं झाली आहेत. लाभधारकांनी व्याजाने पैसे काढून कामं चालू ठेवली आहेत, असे ते म्हणाले. घरकुलासाठी पहिला १५ हजारांचा हप्ता आला त्यावर कामं केली. जिल्हा परिषद आणि पंचायत समितीसाठी निधी येत नाही. शासनाकडून कधी पैसे येणार हा सवालदेखील त्यांनी यावेळी उपस्थित केला.

## मेंढापूरच्या कार्गो विमानतळासाठी प्रयत्न; शेतकऱ्यांच्या विकासाला लागणार हातभार

पंढरपूर तालुक्यातील मेंढापूर हे सोलापूर जिल्ह्याचे मध्यवर्ती ठिकाण आहे. या भागात एक हजार एकर जमीन उपलब्ध करून विमानतळ उभारण्यासाठी आमचे प्रयत्न सुरू आहेत. येथून कार्गो विमानसेवा सुरू झाली, तर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना याचा मोठा फायदा होणार आहे. पंढरपूरकडे येणारे सर्व महामार्ग झाले आहेत. यासाठी विजयसिंह मोहिते-पाटील यांच्या माध्यमातून आम्ही प्रयत्न केले. यापुढच्या काळात या भागाचा विकास करण्यासाठी आमचे प्रयत्न सुरू राहणार आहेत, असेही मोहिते-पाटील यांनी स्पष्ट केले.

## पाणीपुरवठ्याच्या सगळ्या योजना अर्धवट; अनेक वाड्या-वस्त्या वंचित, अधिकाऱ्यांकडून भ्रष्टाचार

सोलापूर जिल्ह्यातील पाणीपुरवठ्याच्या योजना पूर्ण होत नाहीत. सगळ्या योजना अर्धवट आहेत. त्याशिवाय योजनेत अनेक वाड्या-वस्त्यांचा समावेश केलेला नाही. अधिकाऱ्यांनी योजनांमध्ये मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार केलेला आहे.लोकांना वंचित ठेवण्याचं काम केलं आहे. २५ वर्षांनी पाणीपुरवठा योजना येणार आहे, तोपर्यंत वंचित राहिलेल्या लोकांनी काय करायचे? यावर कोण बोलायला तयार नाही.

## पंतप्रधान सडक योजनेत महाराष्ट्राचे मोठे नुकसान; राज्यातील रस्त्यांचे अवस्था होणार बिकट

महाराष्ट्राचे सगळ्यात मोठे नुकसान पंतप्रधान सडक योजनेत झाले आहे. याबद्दल सरकार तोंड उघडायला तयार नाही.५०० लोकवस्ती कव्हर करणं आणि रोजगार हमीची काम अस्तित्वातच राहिलेली नाहीत. जे रस्ते कच्चे होते, ते राहिले नाहीत.शासनाने याचा अभ्यास करुन मुख्यमंत्र्यांना घेऊन केंद्रात मंत्रि शिवराज चौहान यांना भेटून कामे मंजूर करुन आणली पाहिजेत. यात कोणीच लक्ष घालायला तयारी नाही. महाराष्ट्रातील रस्त्यांची अवस्था बिकट होणार आहे.

# अजब महाआघाडी! बार्शीची राज्यभरात चावडी!

✔ सोलापूर/प्रतिनिधी

नगरपालिका आणि महानगरपालिका निवडणुकीदरम्यान काही धक्कादायक युती महाराष्ट्रानं पहिल्यांदा पाहिल्या. अंबरनाथ नगर पालिकामध्ये भाजप आणि काँग्रेसने हातमिळवणी केली होती. पुणे महानगरपालिका निवडणुकीत दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस भाजप विरोधात एकत्र लढताना दिसले. इतर काही ठिकाणी भाजप आणि एमआयएमचीही छुपी किंवा उघड आघाडी झाल्याची चर्चा झाली. आता सोलापूर जिल्ह्यातील बार्शी तालुक्यात दोन्ही शिवसेना आणि दोन्ही राष्ट्रवादींचे 'फ्यूजन' पाहायला मिळत आहे.



बार्शी जिल्हा परिषद निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर भाजपविरोधात दोन्ही शिवसेना एकत्र आल्याने राजकीय वातावरण तापले असून, पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी विरोधकांवर जोरदार टीका केली आहे. अनैसर्गिक युती आघाड्या जनता स्वीकारणार नाही. जनता भाजपच्याच बाजूने राहील, असा ठाम दावा त्यांनी केला. शिवाय दोन्ही शिवसेना आणि राष्ट्रवादी एकत्र होण्यावरुन पालकमंत्र्यांनी डिवचलं आहे.

पालकमंत्री गोरे म्हणाले की, भारतीय जनता पक्ष हा जिल्ह्यातीलच नव्हे, तर राज्यातील सर्वात मोठा पक्ष आहे. अनेक पक्ष स्वतःचे अस्तित्व टिकवण्यासाठी धडपड करत असून, त्यासाठीच विविध युती-आघाड्या केल्या जात आहेत. स्वतःचे अस्तित्व राखण्यासाठी युती कराव्या लागत आहेत, यावरूनच भाजप किती मजबूत आहे, हे स्पष्ट होते, असा टोला त्यांनी लगावला.

महायुतीतील घटक पक्षांनी काही आचारसंहिता पाळणे गरजेचे असल्याचे सांगत, महायुतीच्या बाहेर जाऊन स्थानिक आघाड्या करताना विचारपूर्वक निर्णय घ्यावेत, असा सल्लाही गोरे यांनी दिला.

भाजपचा पराभव एक-दोन-तीन जण एकत्र येऊन करता येणार नाही, हे विरोधकांच्या लक्षात आले आहे. त्यामुळेच आता पाच-पाच पक्ष एकत्र येत आहेत. मात्र अशा अनैसर्गिक युती जनतेच्या गळ्यात उतरणार नाहीत, असे ते म्हणाले. आगामी सोलापूर जिल्हा परिषद निवडणुकीत भाजपचाच अध्यक्ष होईल, असा दावाही त्यांनी केला.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



येन केन प्रकारेन सत्ता स्थापन करण्याचे उपाय !


कल्याण

348-54-149




▶▶ बार्शीत राज्यातला अभूतपूर्व प्रयोग

ठाकरे सेना अन् शिंदे सेना एकत्र; अजितदादांची राष्ट्रवादीही सोबत

बार्शीत जि.प. च्या सहा गटांसाठी ५२ उमेदवारांचे ६० अर्ज वैध

पं. स. बारा गणांसाठी ९८ उमेदवारांचे १०८ अर्ज वैध

✔ बार्शी/प्रतिनिधी

जिल्हा परिषदेच्या बार्शी तालुक्यातील सहा गटांमधील ५२ उमेदवारांचे ६० अर्ज वैध ठरले असून पंचायत समितीच्या १२ गणांसाठी ९८ उमेदवारांचे १०८ अर्ज वैध ठरले आहेत राज्यात ठाकरे सेना आणि शिंदे शिवसेना यांचे वितुष्ट जगजाहीर असताना बार्शी तालुक्यात मात्र या दोन्ही पक्षांचा समन्वय उघड झाला आहे. अजित दादांची राष्ट्रवादी सुद्धा या महाआघाडीमध्ये सामील झाल्याचे दिसते आहे.

ठाकरे सेनेचे विद्यमान आमदार दिलीप सोपल यांच्या पक्षाच्या चिन्हावर केवळ मालवंडी जिल्हा परिषद गटात तालुकाप्रमुख प्रवीण काकडे यांच्या ...



भाजपकडून सर्व गटात आणि गटात उमेदवार

बार्शी तालुक्यात माजी आमदार राजेंद्र राऊत यांनी जिल्हा परिषदेच्या सर्व सहा गटात व पंचायत समितीच्या सर्व बारा गणांत भारतीय जनता पक्षाच्या माध्यमातन उमेदवार ...

निवडणुकीच्या निमित्ताने आपले शिंदे शिवसेना व अजित दादांची राष्ट्रवादी या दोन्ही पक्षांबरोबर असलेले आपले संबंध ...

अर्ज माघारनंतरच संभाव्य लढती निश्चित

गुरूवारी झालेल्या छाननी मध्ये केवळ पांगरी पंचायत समिती गणामध्ये समाधान चव्हाण यांचा अर्ज अवैध ठरला आहे छाननी अंती बहुतांश मतदारसंघांमधील संभाव्य उमेदवार निश्चित झाले आहेत येत्या २७ तारखेपर्यंत काही उमेदवारी अर्ज माघारी घेतल्यानंतरच संभाव्य लढती निश्चित होणार आहेत.

## 'सुराज्य'चे 'करेक्ट' भाकिते!

बार्शीत जि.प., पं.स. निवडणुकीत ठाकरे सेना-शिंदे सेना आणि दोनही राष्ट्रवादी+काँग्रेस एकत्र येण्याचा अंदाज दै. सुराज्यने २३ जानेवारी रोजी वर्तवला होता. ते भााकित शनिवारी खरे ठरले.

## आमदार सोपलांनी सोशल मीडियावर झळकावलेलं पत्रक राज्यभर ठरतंय लक्षवेधी





शिवसेना ठाकरे गटाचे आमदार दिलीप सोपल यांनी सोलापूर जिल्हा परिषद निवडणुकीसाठी महाआघाडी झाल्याचे सोशल मीडियावर अपलोड केले आहे. त्यांनी सोशल मीडियावर पोस्ट केलेल्या एका पत्रकाने संपूर्ण राज्याचे लक्ष वेधून घेतले आहे. या पत्रकात त्यांनी स्पष्ट म्हटले आहे की, जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीसाठी बार्शी तालुक्यात शिवसेना (ठाकरे गट), राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार), शिवसेना (एकनाथ शिंदे), राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) आणि मित्र पक्षांच्या वतीने 'महाआघाडी' करण्यात आली आहे.

## एकाच म्यानात दोन तलावर काय? अहो, बार्शीत चार-चार तलवारी म्हणा !

निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर, मेळाव्यासाठी तयार करण्यात आलेल्या पत्रकावर जे पाहायला मिळाले, त्याची कोणी कल्पनाही केली नसेल. या पत्रकावर शिवसेनेचे 'धनुष्यबाण' आणि 'मशाल' ही दोन्ही चिन्हे शेजारी-शेजारी छापण्यात आली आहेत. विशेष म्हणजे, एकाच बॅनरवर उद्धव ठाकरे, एकनाथ शिंदे, शरद पवार आणि अजित पवार यांचे फोटो एकत्र झळकत आहेत. राज्याच्या राजकारणात एकमेकांचे कट्टर शत्रू समजले जाणारे हे नेते बार्शीत मात्र 'महाआघाडी'च्या नावाखाली एकत्र आल्याचे चित्र आहे.